सूचक – मा.कैलास बारणे | अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/६/कावि/१४३/२०१७ दि.१३/०९/२०१७

महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२१.०८.२०१७ ते दि.२७.०८.२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी

क्र.मुलेप/६/कावि/१४३/२०१७ दि.१३.०९.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१००० विषय क्रमांक – ३७

दिनांक – १९/०९/२०१७ विभाग – स्थापत्य

सूचक – मा.आशा धायगुडे शेंडगे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/उद्यान/कावि/७३/२०१७ दि.११/०९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६८/०१/२०१६-१७ मधील काम क्र.१ अन्वये, प्र.क्र.२० चिंचवडे नगर शाहू उद्यानात शिवसृष्टी विकसित करणेकामी मे.पी.एन.नागणे निवीदा र.रु.१,७५,०७,७६७/- (अक्षरी एक कोटी, पंच्चाहत्तर लाख, सात हजार, सातशे सदुसष्ट फक्त) पेक्षा ११.५०% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१,५४,९४,३७४/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१००१ विषय क्रमांक – ३८

दिनांक – १९/०९/२०१७

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- १) मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव-

२) मा.क्रिडा,कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ५० दिनांक ०८/०९/२०१७ नुसार,

चिंचवड मधील वाल्हेकरवाडी व्यायामशाळा दरमहा र.रु.२,०००/- सेवाशुल्क तत्वावर व मनपा नियमानुसार तीन वर्षे कालावधीकरिता गुरुदेवनगर मित्रमंडळ, आकुर्डी या मंडळास चालविण्यास देण्यात यावी. गुरुदेवनगर मित्र मंडळ, आकुर्डी या मंडळाचा रजिस्टर नंबर महा १४९९/१३ हा आहे. गुरुदेवनगर मित्र मंडळाचे काम अतिशय चांगल्या पध्दतीचे आहे. तरी सदरची व्यायामशाळा गुरुदेवनगर मित्र मंडळ, आकुर्डी यांना सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१००२ विषय क्रमांक – ३९

दिनांक – १९/०९/२०१७

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- १) मा.भिमाबाई फुगे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव-

२) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ५१ दिनांक ०८/०९/२०१७ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्यानिकेतन प्राथमिक शाळेजवळील नवमहाराष्ट्र व्यायामशाळा मैत्री स्वयंरोजगार सेवा संस्था, पिंपरीगाव या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- सेवाशुल्क मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१००३ विषय क्रमांक – ४०

दिनांक – १९/०९/२०१७

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- १) मा.भिमाबाई फुगे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव-

२) मा.क्रिडा,कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ५२ दिनांक ०८/०९/२०१७ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कै.दशरथ नामदेव कापसे, पिंपरीगाव व्यायामशाळा, त्यावरील रिक्त सभागृह मैत्री स्वयंरोजगार सेवा संस्था, पिंपरीगाव या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- सेवाशुल्क मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१००४ विषय क्रमांक – ४१

दिनांक – १९/०९/२०१७

सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- १) मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव-

२) मा.क्रिडा,कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ५३ दिनांक ०८/०९/२०१७ नुसार

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, भारतीय कुस्ती संघटना यांच्या मान्यतेने माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये मोशी येथे महापौर चषक आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धा २०१७-१८ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१००५ विषय क्रमांक – ४२

दिनांक – १९/०९/२०१७

सूचक – मा.राजू मिसाळ अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- १) मा.सचिन भोसले, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव-

२) मा.क्रिडा,कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ५४ दिनांक ०८/०९/२०१७ नुसार

खिंवसरा पाटील व्यायामशाळेमध्ये थेरगाव, वाकड तसेच मावळ, मुळशी परिसरातील ४० ते ४५ पैलवान नियमित सराव करीत असतात. सर्व पैलवान कुस्तीचा सराव याच मातीच्या हौदात नियमितपणे करतात. त्यामुळे ही माती सराव करण्यासाठी योग्य प्रतीची व आरोग्यदायक असणे आवश्यक आहे. परंतु बरेच वर्षापासून या मातीला खाद्य मिळालेले नाही. तसेच या हौदातील मातीची मशागत देखील करण्यात आलेली नाही. तरी लवकरात लवकर सदर तालमीमध्ये मातीला खाद्य व मशागतीसाठी र.रु.४५,०००/- (अक्षरी र.रु.पंचेचाळीस हजार फक्त) किंवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१००६ विषय क्रमांक – ४३

दिनांक – १९/०९/२०१७

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- १) मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.अंबरनाथ कांबळे यांचा प्रस्ताव-

२) मा.क्रिडा,कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ४८ दिनांक २८/०८/२०१७ व मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ५५ दिनांक ०८/०९/२०१७ नुसार,

विषय - से.२८, निगडी मधील कै.संजय काळे हेल्थ क्लब ही व्यायामशाळा एकविरा सेवा संघ, चिंचवड यांना सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत...

विषय क्रमांक ४३ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१००७ विषय क्रमांक – ४४

दिनांक – १९/०९/२०१७ विभाग – ब क्षेत्रिय कार्यालय

सूचक – मा.आशा धायगुडे शेंडगे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बक्षे/लेखा/९अ/कावि/१०८/२०१७ दि.११/९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ब क्षेत्रिय कार्यालयामधील सन २००५ ते २००८ या वित्तिय वर्षात लेखाशिर्षावर अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जादा खर्च झालेल्या डि.ओ.सी.क्र.२०१५ आक्षेप क्र.९६ एकूण र.रु.४७,०३,३१५/- व आक्षेप क्र.४४ एकूण र.रु.८,७६०/-चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम १०३ शेड्यूल चाप्टर ७ नुसार व मा. मुख्यलेखापाल यांचेकडील परिपत्रक क्र. लेखा/आपु/कावि/१७/२०११ दि.२३/८/२०११ नुसार लेखाशिर्षावर अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जादा

झालेल्या खर्चास सक्षम समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने प्रस्तावात नमूद प्रमाणे जादा झालेल्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१००८ विषय क्रमांक – ४५

दिनांक – १९/०९/२०१७ विभाग – फ क्षेत्रिय कार्यालय,स्थापत्य

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.१००३/२०१७ दि.१५/९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात नमूद प्रमाणे प्रभाग क्र.४ कृष्णानगर येथे शरदनगर, शिवाजी पार्कला जोडणारा स्पाईन रस्त्यावर पादचारी भुयारी मार्ग बांधणेचे कामासाठी मे.सी.व्ही.कांड कंन्सलटंट प्रा.ली. यांची सल्लागार म्हणून नेमणूक करून मनपाच्या प्रचलीत दरानुसार व मा.आयुक्त सो यांचे दिनांक १०/८/२०१७ रोजीचे मंजुर प्रस्तावीत दरांप्रमाणे निविदा पुर्व (Pre Tender Activity) १% व निविदा पश्चात (Post Tender Activity) साठी १.७५% असे एकूण २.७५% सर्व करांसहीत देय्य फी निश्चीत करून विषयांकीत कामासाठी नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१००९ विषय क्रमांक – ४६

दिनांक – १९/०९/२०१७ विभाग – ग क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य

सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.गक्षे/स्था/काविज/११/२४५/२०१७ दि.१५/९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात नमूद प्रमाणे प्रभाग क्र. २४ थेरगाव येथे डी.पी. आरक्षण क्र. ६२८ येथील खेळाचे मैदान विकसीत करणे या प्रकल्पासाठी मे. शिल्पी आर्किटेक्ट यांची सदर कामाचा पुर्वानुभव लक्षात घेता वास्तुविशारद सल्लागार (Architect) व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) म्हणून नेमणूक करणेस व प्रकल्प तांत्रीक दृष्ट्या व यशस्वीपणे पुर्ण होणेकामी त्यांना याकरिता मनपाचे प्रचलित दरानुसार निविदापुर्व कामासाठी लघुत्तम निविदा दराच्या २.००% सर्व करांसहित निविदा पश्चात कामासाठी लघुत्तम निविदा दराचे १.३५% (सर्व करांसहित) अशा प्रकारे फी अदायगी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०१० विषय क्रमांक – ४७

दिनांक – १९/०९/२०१७ विभाग – माहिती व तंत्रज्ञान

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/११/कावि/२७१/२०१७ दि.१५/९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विविध संगणक प्रणालित वस्तु व सेवा कराच्या अनुशंगाने बदल करणे व त्यांचे इंटिग्रेशन करणे व ई-निविदा संगणक प्राणाली मध्ये दुरूस्तीकरणे साठी विविध विभागांच्या संगणक

प्रणालीमधिल करावयाच्या बदलांची निकड (वस्तु व सेवा कराच्या अंमलबजावणी मुळे) व तातडीची बाब विचारात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अनुसुची प्रकरण ५ नियम २ (२) चे नुसार निविदा प्रसिद्ध न करता थेट पद्धतीने परंतू करारनामा करून मे.प्रोबिटी सॉफ्ट प्रा.लि.,पुणे यांचेमार्फत ई-गव्हर्नन्स प्रकल्पांच्या संगणक प्रणाली मधिल बदल करणे बाबतचे कामकाज करून घेणेस येणा-या र.रू.३२,८२,५००/-(अक्षरी र.रू.बत्तीस लाख ब्यांऐंशी हजार पाचशे फक्त) अधिक कर व त्या अनुषंगाने येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**<u>यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले -</u>**

ठराव क्रमांक – १०११ विषय क्रमांक – ४८
दिनांक – १९/०९/२०१७ विभाग – जेएनएनयुआरएम कक्ष
सूचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.उत्तम केंदळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. जेएनएनयुआरएम/३/कावि/३६७/२०१७ दि.१८/०९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुर्ननिर्माण अभियान (JNNURM), अमृत अभियान, स्वच्छ भारत अभियान, स्मार्ट सिटी अभियान, तसेच केंद्र शासन पुरस्कृत विविध योजनांचे अनुषंगाने वेळचे वेळी करावयाचे Project Monitoring & Reform Implementation Support (PMRIS) चे कामकाज करणेकामी ई-निविदा क्र.१४/२०१६-१७ अन्वये मे.क्रिसिल रिस्क एन्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि. यांना करारनामा करुन करारनामा अटी शर्तीचे अधीन राहून आदेशाचे दिनांकापासून पुढे १२ महिने कालावधीकरीता दरमहा र.रु.७,५०,०००/- + जी.एस.टी. (१८%) याप्रमाणे १२ महिने कालावधीकरीता एकूण र.रु.९०,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये नव्वद लाख फक्त) + जी.एस.टी. (१८%) याप्रमाणे खर्च अपेक्षित असून प्रस्तुत कामकाजाकरीता मे.क्रिसिल रिस्क एन्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन्स लि. यांची नेमणूक करणेकामी व त्याकामी येणा-या एकूण खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १०१२ विषय क्रमांक – ४९
दिनांक – १९/०९/२०१७ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय
सूचक – मा.कोमल मेवानी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमुका/४/कावि/६१६/२०१७ दि.१९/०९/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत ई-निविदा नोटीस क्र.३/२०१७-१८ प्रसिद्ध करुन म.न.पा.चे “अ”,“ब”,“क”,“ड”,“इ”,“फ” क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते/गटर्स साफसफाई करणेकामी किमान वेतन दराने कामगार उपलब्ध करणे या कामासाठी २ वर्षे कालावधीसाठी किमान वेतनावरील सेवा शुल्कावर निविदा मागविण्यात आली होती. प्रस्तावात नमूद केलेल्या तक्त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयनिहाय एकूण १००० कामगार किमान वेतन दराने २ वर्षे

कालावधीसाठी पुरविणेकामी किमान वेतन दराची र.रु.२७,०३,७९,९१८/- त्यावरील सेवा शुल्क १० टक्के (र.रु.२,७०,३७,९१८/-) साठी प्राप्त लघुत्तम निविदा दर र.रु.५१,५७,०३५/- असे एकूण र.रु.२७,५५,३६,९५३/- (अक्षरी रक्कम रुपये सत्तावीस कोटी,पंचावन्न लाख, छत्तीस हजार नऊशे त्रेपन्न फक्त) इतके अपेक्षित खर्चास तसेच राज्य शासनाने किमान वेतन दराचे विशेष भत्त्यात वाढ केल्यास त्यानुसार अदा करावयाचे प्रत्यक्ष खर्चास, संबंधितांबरोबर २ वर्षांचा करारनामा करुन कामाचा आदेश देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०१३ विषय क्रमांक – ५०

दिनांक – १९/०९/२०१७ विभाग – पशुवैद्यकीय

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.निर्मला कुटे

संदर्भ:- मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे जावक क्र.पवै/१/कावि/३८६/२०१७ दि.२९/०८/२०१७

मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागांतर्गत महानगरपालिकेकडे प्राप्त होणा-या शहरातील तक्रारींचे अनुषंगाने ठेकेदाराने संदर्भिय क्षेत्रातील डुकरे पकडणे, पकडणेत आलेल्या डूकरांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करणे/विल्हेवाट लावणे याकरीता लागणारे साहित्य औषधे, मनुष्यबळ, वाहन, इंधन याकामी येणारा सर्व खर्च ठेकेदाराने करावयाच्या कामकाजासाठी तुलनात्मकरित्या प्राप्त लघुत्तम दर निविदाधारक (१) मे.जी.बी.इंटरप्रायजेस, थेरगांव, पुणे-३३ या संस्थेचे प्रति महा दर र.रु.१,८०,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख ऐंशी हजार फक्त) स्विकृत करुन, या संस्थेची नेमणूक तसेच कामाचे आदेश देणेस व याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास ३ महीने कालावधीकरीता अटी व शर्तीस अधीन राहून मान्यता देणेत आली असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय** – सदर कामात किती निधी खर्च करतोय यापेक्षा या कामाचे मॉनिटरींग केले पाहीजे. पकडलेल्या डूकरांना स्पेशल कोड नंबर द्यावा. या कामात सुसूत्रता असली पाहीजे. या कामावर विभागाचा अंकुश असला पाहिजे.

----------

ठराव क्रमांक –१०१४ विषय क्रमांक – ५१

दिनांक – १९/०९/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.राजू मिसाळ

संदर्भ:- मा.आशा धायगुडे-शेंडगे, मा.राजू मिसाळ यांचा प्रस्ताव...

महानगरपालिकेच्या घंटागाडी कामगारांना आस्थापना कामगारांप्रमाणे ८.३३% बोनस मिळत नाही. त्यांना सन २०१६-१७ दिवाळी सणाकरिता विशेष बाब / बक्षिस म्हणून र.रु.१५,०००/- दिले आहेत. यंदा सन २०१७-१८ सालाकरिता दिवाळी सणाकरिता घंटागाडी कामगारांना तसेच पुर्व शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये काम करणा-या सफाई कर्मचारी यांना प्रत्येकी विशेष बाब/बक्षिस रक्कम रुपये १५,०००/- देण्यास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय** – शाळांमध्ये काम करणा-या कंत्राटी सफाई कर्मचा-यांना मिनिमम वेजेस ॲक्टप्रमाणे मानधन देण्यात यावे. तसे विषयपत्र तयार करुन मा.स्थायी समितीसमोर मंजूरीसाठी आणावे.

----------

ठराव क्रमांक –१०१५ विषय क्रमांक – ५२

दिनांक – १९/०९/२०१७

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ:- मा.उत्तम केंदळे,मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.८९२ दि.६/९/२०१७ मध्ये कोटेशन क्र.१५/२०१५-१६ असे नमुद करणेत आले आहे. त्यामध्ये कोटेशन नोटीस क्र.०५/२०१७-१८ अशी दुरुस्ती करणेस व सदर दुरुस्तीसह या विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०१६ विषय क्रमांक – ५३

दिनांक – १९/०९/२०१७

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.उत्तम केंदळे,मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या BRTS विभागाच्या कार्यालयाचे कार्यक्षेत्राअंतर्गत खालील स्थापत्यविषयक विकास कामे करणे आवश्यक आहेत. सदर प्रस्तावीत विकास कामांतर्गत करण्यात येणा-या रस्ते,पूल व इमारतींच्या संकल्पनासाठी, बांधकामासाठी तसेच खास दुरुस्तीसाठी पुरेसे तांत्रिक नैपुण्य महानगरपालिकेकडील अभियंतांकडे उपलब्ध असलेतरी काही वेळा अपु-या कर्मचारी वर्गामुळे अथवा काही प्रसंगी गुंतागुंतीचे तांत्रिक प्रश्न, आधुनिक तंत्रज्ञानाची गरज, पर्यावरण विषयक अभ्यास तसेच खाजगी कारणातून अभ्यास व तत्सम बाबी, सुसाध्यतेची पडताळणी, संशोधनात्मक अभ्यास तसेच खाजगीकरणातून करावयाच्या प्रकल्पांसाठी कायदेविषयक, अर्थविषयक अन्वेशन अशा बाबींसाठी आर्किटेक्टस्, सल्लागारा किंवा तज्ञ नेमण्याची आवश्यकता असल्यामुळे, फ क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामधील विविध विकास कामांसाठी खालीलप्रमाणे विकास कामानिहाय आर्किटेक्टस् व सल्लागार यांची नेमणूक करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | आर्किटेक्टचे/प्रोजेक्ट मॅनेजमेंट/कन्सल्टंसीचे नाव |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१३ निगडी गावठाण मुंबई-पुणे रस्ता इन्सपीरीया मॉल ते विद्यानंद भवन शाळा/मनपा शाळा यादरम्यान भुयारी पादचारी व दुचारी मार्ग करणे. | मे.स्तुप कन्सल्टंटस |

वरील विकास कामास आर्किटेक्टस, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्स्लटंटची नेमणूक करणेसाठी इमारतीचे नकाशे बनविणे, प्लॅनिंग व डिझाईन तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे व बांधकाम परवानगी घेणे व निविदा पुर्व कार्यवाही पर्यंत सर्व कामे करणे यासाठी त्यांची मनपा पॅनेलवरील वास्तुविशारद/सल्लागार म्हणून नेमणूक करणेत आलेल्या आर्किटेक्टस, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट यांनी रस्ते,पावसाळी जलवाहिका (Storm water) व इतर स्थापत्यविषयक प्रकल्प कामांसाठी देणेत

येणा-या फी मध्ये खालीलप्रमाणे मा.आयुक्त सो यांनी दिनांक १०/८/२०१७ चे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे.

| Sr.No. | Category | Pre Tender Fees (Phase I,II,III) | Post Tender Fees (Phase IV) | Total Fees |
|---|---|---|---|---|
| I | Upto 5 Crore | 0.75% | 1.25% | 2.00% |
| II | 5 to 20 Crore | 0.75% | 1.00% | 1.75% |
| III | 20 to 50 Crore | 0.50% | 1.00% | 1.50% |
| IV | Above 50 Crore | 0.25% | 1.00% | 1.25% |

उपरोक्त नमुद केलेल्या मनपाचे विकास कामास मनपा पॅनेलवरील वास्तुविशारद म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०१७ विषय क्रमांक – ५४

दिनांक – १९/०९/२०१७

सूचक – मा.कुंदन गायकवाड अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.कुंदन गायकवाड, मा.अमित गावडे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्राअंतर्गत विविध स्थापत्यविषयक विकास कामे सन २०१७-१८ चे अर्थसंकल्पामध्ये प्रस्तावित केलेली आहेत. सदर प्रस्तावीत कामांतर्गत करण्यात येणा-या रस्ते,पूल व इमारतींच्या संकल्पनासाठी, बांधकामासाठी तसेच खास दुरुस्तीसाठी पुरेसे तांत्रिक नैपुण्य महानगरपालिकेकडील अभियंतांकडे उपलब्ध असलेतरी काही वेळा अपु-या कर्मचारी वर्गामुळे अथवा काही प्रसंगी गुंतागुंतीचे तांत्रिक प्रश्न, आधुनिक तंत्रज्ञानाची गरज, पर्यावरण विषयक अभ्यास तसेच खाजगी कारणातून अभ्यास व तत्सम बाबी, सुसाध्यतेची पडताळणी, संशोधनात्मक अभ्यास तसेच खाजगीकरणातून करावयाच्या प्रकल्पांसाठी कायदेविषयक, अर्थविषयक अन्वेशन अशा बाबींसाठी आर्किटेक्टस्, सल्लागार किंवा तज्ञ नेमण्याची आवश्यकता असल्यामुळे, फ क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामधील विविध विकास कामांसाठी खालीलप्रमाणे विकास कामानिहाय आर्किटेक्टस् व सल्लागार यांची नेमणूक करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | आर्किटेक्टचे/प्रोजेक्ट मॅनेजमेंट/कन्सल्टंसीचे नाव |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.३ चिखली येथील देहु आळंदी रस्ता ते धर्मराजनगरकडे जाणारा १८.०० मी. डि.पी. रस्ता विकसीत करणे. | मे.स्वराज इंजिनिअरींग कन्सल्टन्सी |
| २. | प्रभाग क्र.३ चिखली येथील १/९८ टाऊन हॉल विकसीत करणे. | मे.अर्थस्केप आर्किटेक्टस अँड कन्सल्टंटस करिता आर्किटेक्ट सचिन शाह |
| ३. | प्रभाग क्र.३ चिखली मधील चिखली चौक ते स्मशानभुमीकडे जाणारा डिपी रस्ता विकसीत करणे. | मे.स्वराज इंजिनिअरींग कन्सल्टंसी |
| ४. | प्रभाग क्र.३ चिखली येथील पाटील नगर, बगवस्ती, सोनवणे वस्ती, मोरेवस्ती येथील अंतर्गत रस्ते विकसीत करणे. | मे.स्वराज इंजिनिअरींग कन्सल्टंसी |

| | | |
|---|---|---|
| ५. | प्रभाग क्र.१ तळवडे चिखली तळवडे हद्दीत वरील शिवेचा रस्ता विकसीत करणे. | मे.पेव्हटेक कन्सल्टंटस |

वरील उपरोक्त विविध विकास कामांना आर्किटेक्टस, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्स्लटंटची नेमणूक करणेसाठी इमारतीचे नकाशे बनविणे, प्लॅनिंग व डिझाईन तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे व बांधकाम परवानगी घेणे व निविदा पुर्व कार्यवाही पर्यंत सर्व कामे करणे यासाठी त्यांची मनपा पॅनेलवरील वास्तुविशारद/सल्लागार म्हणून नेमणूक करणेत आलेल्या आर्किटेक्टस, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट यांनी रस्ते,पावसाळी जलवाहिका (Storm water) व इतर स्थापत्यविषयक प्रकल्प कामांसाठी देणेत येणा-या फी मध्ये खालीलप्रमाणे मा.आयुक्त सो यांनी दिनांक १०/८/२०१७ चे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे.

| Sr.No. | Category | Pre Tender Fees (Phase I,II,III) | Post Tender Fees (Phase IV) | Total Fees |
|---|---|---|---|---|
| I | Upto 5 Crore | 0.75% | 1.25% | 2.00% |
| II | 5 to 20 Crore | 0.75% | 1.00% | 1.75% |
| III | 20 to 50 Crore | 0.50% | 1.00% | 1.50% |
| IV | Above 50 Crore | 0.25% | 1.00% | 1.25% |

उपरोक्त नमुद केलेल्या मनपाचे विकास कामास मनपा पॅनेलवरील वास्तुविशारद म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –१०१८ विषय क्रमांक – ५५

दिनांक – १९/०९/२०१७

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.कैलास बारणे

संदर्भ:- मा.उत्तम केंदळे, मा.कैलास बारणे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्राअंतर्गत विविध स्थापत्यविषयक विकास कामे सन २०१७-१८ चे अर्थसंकल्पामध्ये प्रस्तावित केलेली आहेत. सदर प्रस्तावीत कामांतर्गत करण्यात येणा-या रस्ते,पूल व इमारतींच्या संकल्पनासाठी, बांधकामासाठी तसेच खास दुरुस्तीसाठी पुरेसे तांत्रिक नैपुण्य महानगरपालिकेकडील अभियंतांकडे उपलब्ध असलेतरी काही वेळा अपु-या कर्मचारी वर्गामुळे अथवा काही प्रसंगी गुंतागुंतीचे तांत्रिक प्रश्न, आधुनिक तंत्रज्ञानाची गरज, पर्यावरण विषयक अभ्यास तसेच खाजगी कारणातून अभ्यास व तत्सम बाबी, सुसाध्यतेची पडताळणी, संशोधनात्मक अभ्यास तसेच खाजगीकरणातून करावयाच्या प्रकल्पांसाठी कायदेविषयक, अर्थविषयक अन्वेशन अशा बाबींसाठी आर्किटेक्टस्, सल्लागार किंवा तज्ञ नेमण्याची आवश्यकता असल्यामुळे, फ क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामधील विविध विकास कामांसाठी खालीलप्रमाणे विकास कामानिहाय आर्किटेक्टस् व सल्लागार यांची नेमणूक करणे आवश्यक आहे

| अ.क्र. | कामाचे नाव | आर्किटेक्टचे/प्रोजेक्ट मॅनेजमेंट/कन्सल्टंसीचे नाव |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.११ यमुनानगर येथे श्री.छत्रपती संभाजीराजे क्रिडांगण येथे मल्टी स्पोर्टस ग्राऊंड विकसीत करणे. | मे.अर्थस्केप आर्किटेक्टस अँड कन्सल्टंटस करिता आर्किटेक्ट सचिन शाह |

| | | |
|---|---|---|
| २. | प्रभाग क्र.१३ निगडी गावठाण मधील मुस्लीम दफनभुमीच्या सिमाभिंतीची उंची वाढवून त्यास मिहराब व मिनार बांधणे. | मे.अर्थस्केप आर्किटेक्टस अँड कन्सल्टंटस करिता आर्किटेक्ट सचिन शाह |

वरील उपरोक्त विविध विकास कामांना आर्किटेक्टस, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्स्लटंटची नेमणूक करणेसाठी इमारतीचे नकाशे बनविणे, प्लॅनिंग व डिझाईन तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे व बांधकाम परवानगी घेणे व निविदा पुर्व कार्यवाही पर्यंत सर्व कामे करणे यासाठी त्यांची मनपा पॅनेलवरील वास्तुविशारद/सल्लागार म्हणून नेमणूक करणेत आलेल्या आर्किटेक्टस, प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट यांनी रस्ते,पावसाळी जलवाहिका (Storm water) व इतर स्थापत्यविषयक प्रकल्प कामांसाठी देणेत येणा-या फी मध्ये खालीलप्रमाणे मा.आयुक्त सो यांनी दिनांक १०/८/२०१७ चे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे.

| Sr.No. | Category | Pre Tender Fees (Phase I,II,III) | Post Tender Fees (Phase IV) | Total Fees |
|---|---|---|---|---|
| I | Upto 5 Crore | 0.75% | 1.25% | 2.00% |
| II | 5 to 20 Crore | 0.75% | 1.00% | 1.75% |
| III | 20 to 50 Crore | 0.50% | 1.00% | 1.50% |
| IV | Above 50 Crore | 0.25% | 1.00% | 1.25% |

उपरोक्त नमुद केलेल्या मनपाचे विकास कामास मनपा पॅनेलवरील वास्तुविशारद म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**निर्णय – <u>प्रभागांतील अतिक्रमण कारवाईबाबत -</u>**

१) प्रभागांतील अतिक्रमण पथकाच्या कारवाईकरीता वाहने उपलब्ध आहेत पण वाहनचालक उपलब्ध नसतीलतर त्यांची कंत्राटी पद्धतीने भरती करण्यात यावी. याबाबत प्रभाग अधिकारी यांनी प्रस्ताव ठेवून त्यावर प्रशासनाचा अभिप्राय घ्यावा व वाहनचालकांची नेमणूक करण्यात यावी.

२) अतिक्रमण कारवाई करण्याकरिता प्रशासनाकडून एक स्पेशल टास्क फोर्स तयार करण्यात यावा. अतिक्रमण विभाग हा विशेष विभाग असला पाहीजे. आरोग्य विभाग, स्थापत्य विभाग यांचे कर्मचारी, सुरक्षा विभागाकडील धष्टपुष्ट,तगडे कर्मचारी तसेच एक्ससर्वीसमन यांचा यात समावेश करावा. यांना क्रेन/आवश्यक मशिनरी द्या, पोलिस फोर्स द्या. संध्याकाळी कारवाई करण्यासाठी त्यांना ओव्हरटाईम द्या. सर्व प्रभागस्तरावर तीन ते चार पोलिस त्यांच्या वाहनांसह घ्यावेत. पुढील आठवड्यात त्यांच्याकडून कारवाई झालेली दिसली पाहीजे.

३) अतिक्रमणाबाबत नगरसदस्यांकडून, नागरीकांकडून सारथी वेबपोर्टलवर तक्रार दिल्यास संबंधित कर्मचा-यांकडून त्याची दखल गांभिर्याने घेतली जात नाही. याबाबत प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी.

४) मा.आयुक्त यांना आदेश आहेत की, आपण मा.तांबे,कार्य.अभियंता, यांना आदेश द्यावेत की, उद्यापासून सर्व प्रभागांमध्ये हातगाड्या रस्त्यांवर दिसल्या नाही पाहीजेत. तसेच

मा.आयुक्त यांनी मा.तांबे,कार्य.अभियंता, यांना आत्ताच्याआत्ता ताबडतोब स्टँडींग ऑर्डर करावी.

५) थेरगाव डांगे चौकातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोर दररोज ट्रॅफिक जाम असते. चिंचवडकडे वळताना बसला वळता येत नाही. एक चारचाकी जाईल एवढीच जागा तिथे शिल्लक असते. पंधरा सेकंदांचा सिग्नल असलातरी तिथे पाच ते दहा मिनिटे थांबावे लागते. संध्याकाळी इतक्या हातगाड्या लागलेल्या असतात. त्यांच्यावर दररोज कारवाई करण्यात यावी. शहरातील फूटपाथ, रस्ते वाहतुकीसाठी मोकळे करण्यात यावेत.

६) स्पाईन रोडला चायनिज गाड्यांवर दारू विक्रि केली जाते, चायनिज उघड्यावर विकले जाते. त्या सगळ्या गाड्या काढून टाकाव्यात.

७) अतिक्रमण विभागाचा स्पेशल ड्राईव्ह हा संध्याकाळी ६ ते ८ किंवा ६ ते १० असा करण्यात यावा.

८) प्रशासनाने याबाबत युद्धपातळीवर कारवाई करावी. यासाठी उद्या सर्व अधिका-यांना बोलवून घेऊन त्यांची एक समिती गठीत झाली पाहीजे.

-------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/७३/२०१७
दिनांक - २८/०९/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.